नियमित दिवाणी दावा क्र.७०/२०२२
शिलाताई सांबारे - वि. - सुरेश कुळकर्णी
**निशाणी क्र.१६ खाली.**

**वादी तर्फे साक्षीदार क्र.०१**
**नाव** :- शिलाताई उत्तमराव संबारे,

**<u>निशाणी क्र ३६ वरील आदेशानुसार प्रतिवादीतर्फे उलटतपास पी.एन.पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरू..</u>**

०२. माझी प्रतिवादीशी ओळख सहकार भारतीच्या सेमिनारमध्ये झाली. माझा पुणे येथे प्रतिवादीच्या फ्लॅटजवळ माझे घर नाही. प्रतिवादी हा भारतीय स्टेट बँक भावधान शाखा, पुणे येथे तो मॅनेजर या पदावर कार्यरत असल्याचे त्याने स्वतः मला सांगितले. त्याने मला बँकेचे ओळखपत्र वगैरे दाखविलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सर्वसाधारणपणे जर एकखाद्या सामान्य मानसाने तो बँकेत काम करत आहे असे म्हटले असते तर कागदपत्राविना मी त्याच्यावर विश्वास ठेवला नसता. मी हाराशीमध्ये असलेला प्लॉटचा व्यवहार प्रतिवादी याच्यासोबत केला. सदर प्लॉट का कोणत्या शिवारात आहे, त्याचा जमीन गट क्रमांक व प्लॉट क्रमांक काय हे माझ्या दाव्यात नमुद केलेले नाही. मी सदर प्लॉटचे सौदेपावती करारनामा या प्रकरणात जोडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, शैला बांदल यांचा प्लॉट विकत घेण्याचे प्रतिवादीने सांगितलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने माझ्या मुलींच्या शिक्षणाकरिता रोखीने पैसे दिले होते व ते पैसे मी प्रतिवादीला रोख स्वरूपात परत केले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने आजतागायत मला कोणतेही चेक दिलेले नाही. मी प्रतिवादीविरुध्द कलम १३८ एन.आय. ॲक्ट नुसार प्रतिवादीविरुध्द कारवाई केली होती. त्याचे कागदपत्र मी सदर प्रकरणात जोडलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचे माझ्याकडे कोणतेही देणे लागत नसतांना केवळ त्याच्याकडून पैसे उकळण्याच्या उद्देशाने सदरचा खोटा दावा मी दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादीने कोणतेही चेक दिले नाही त्यामुळे ते चेक वटण्याचा प्रश्न येत नाही आणि म्हणून मी प्रतिवादीविरुध्द कलम १३८ अंतर्गत कोणतीही कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर प्रकरणात दाव्याला आधारित असलेले दस्त दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.08.13 16:38:18 +0530

दिनांक : १३/०८/२०२५.

**(पी.एस.ठाकरे)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
मलकापूर